सत्यमेव जयते

# पासपोर्ट सेवा (जारी व वितरण), नागरीकांची सनद -२०१६

## केंद्रीय पासपोर्ट संगठन,

## विदेश मंत्रालय



**फ्री अनुवाद**

# पासपोर्ट सेवा (जारी व वितरण), नागरीकांची सनद २०१६
# केंद्रीय पासपोर्ट संगठन, विदेश मंत्रालय

## १) प्रस्तावना :-

१.१ भारतीय पारपत्र आणि इतर प्रवासी दस्तऐवज जसे सर्टिफिकेट ऑफ आयडेंटिटि, इमरजन्सी सर्टिफिकेट,पोलीस क्लिअरन्स सर्टिफिकेट, क्रॉस एलओसी, प्रवासी परमिट हे विदेश मंत्रालय भारत सरकार यांच्या गौण कार्यालयीन च्या माध्यमातुन जारी करते. गौण कार्यालयः-( केंद्रीय पासपोर्ट संगठन व त्यांचे पारपत्र जारी करणारे भारतातले अधिकारी आणि विदेशातले अधिकारी)

१.२ भारतीय नागरीकांसाठी पासपोर्ट व इतर प्रवासी दस्तऐवज जारी करने हे पासपोर्ट अधिनियम १९६७ ने नियंत्रीत होतात. या कायद्यान्वये वैध पासपोर्ट किंवा प्रवास दस्तऐवज यांच्या विना भारताबाहेर जाण्यास कोणत्याही व्यक्तिस प्रतिबंध आहे. या कायद्यात पासपोर्ट किंवा प्रवासी दस्तऐवज मिळविण्याची प्रक्रिया दिली आहे. तसेच कोणत्या कारणास्तव पासपोर्ट किंवा प्रवासी दस्तऐवज नाकारला जाऊ शकतो. हे ही स्पष्ट केले आहे. त्या कायद्यात पासपोर्ट किंवा प्रवास दस्तऐवज जप्तीचे प्रावधान आहे. आणि जप्ती रद्द करण्याची कारणे देखील कायद्यात दिली आहेत.या कायद्यामध्ये जप्तीच्या व पासपोर्ट रद्द करण्याच्या आदेशाविरुध्द अपिल करण्याचे प्रावधान देखिल करण्यात आलेले आहे.

## २) नागरीकांची सनद :-

ही नागरीकांची सनद भारतातील केंद्रीय पासपोर्ट संगठन, विदेश मंत्रालय यांच्या प्रशासकिय नियंत्रणाखाली काम करणाऱ्या भारतातील पासपोर्ट कार्यालयातर्फे दिल्या जाणाऱ्या पासपोर्ट सेवा संदर्भात आहे. विदेशातील भारतीय दुतावासातर्फे देण्यात येणाऱ्या पासपोर्ट सेवांना या सनदीच्या आखत्यारीतुन वगळण्यात आले आहे.

## ३) दृष्टी विधान :-

विदेश मंत्रालय, आपल्या पासपोर्ट जारी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या नेटवर्क च्या माध्यामातुन पासपोर्ट अधिनियम १९६७ आणि नियम उपबंधनानुसार नागरीकांना वेळेवर, पारदर्शक, अधिक सुलभ, विश्वसनीय रीतीने व सुखदायक वातावरणात, सुटसुटीत पध्दतीने आणि वचनबध्द, प्रशिक्षित आणि प्रवृत्त कर्मचाऱ्यांमार्फत पासपोर्ट सेवा देण्याचा प्रयत्न करणार.

## ४) सेवांची सूची :-

१.१ जारी करणे

- पासपोर्ट
- पोलीस क्लिअरन्स सर्टिफिकेट
- पासपोर्ट सरेन्डर सर्टिफिकेट
- पासपोर्ट वर आधारीत इतर प्रमाणपत्रे.

४.२ नागरीकांच्या फायद्यासाठी www.passportindia.gov.in या संकेतस्थळावर तपशिलवार सुचना आणि पासपोर्ट सेवा संबंधित माहीती - शुल्क व लागणारी कागदपत्रे यांच्यासहीत दिलेली आहे.

## ५) नागरिक मदत सेवा :-

| | |
|---|---|
| पासपोर्ट सेवा केंद्र(पीएसके) | संपुर्ण भारतातील पीएसके विविध सोयी सुविधा जसे कार्यकारी मदत, माहिति केंद्र, छायांकीत प्रती, अन्न व पेय सुविधा, सार्वजनिक दुरध्वनी , शिशुकाळजी कक्ष, टि.व्ही.,इलेक्ट्रॉनिक रांग व्यवस्थापन प्रणाली, एटिएम सुविधा, विकलांग व्यक्तिंसाठी विशेष सुविधा प्रदान करतात. |
| माहिती पुरवठा, ऑनलाईन रजिस्ट्रेशन, आवेदन फि भरणा, अपॉइंटमेंन्ट, आवेदन स्थितीचा शोध. | 'कधीही, कुठेही' तत्वावर उपलब्ध आहे. नागरिक पासपोर्ट संकेतस्थळावर आपला ऑनलाईन अर्ज सबमीट करु शकतात. व जवळच्या पी.एस.के ला भेट देण्याची अपॉइंटमेंन्ट घेवु शकतात. अपॉइंटमेंन्ट साधारणतः १ — ७ कार्यालयीन दिवसांच्या अवधित मिळते. तथापी, याच्यामध्ये हंगामी व क्षेत्रीय तफावत होऊ शकते |
| नॅशनल कॉल सेंटर | २४ X ७ टोल फ्री संवादी आवाज प्रतिसाद मदत १७ भारतीय भाषांमध्ये सकाळी ८.०० ते रात्री १०.०० वा.मध्ये कार्यकारी मदत उपलब्ध आहे. |
| एसएमएस स्टेटस ट्रॅकिंग सेवा | मुलभुत मोफत एसएमएस सेवे व्यतिरीक्त, वैक्लपिक प्रिमीयम सेवा देखिल नाममात्र शुल्क देऊन उपलब्ध आहे. |
| ई-मेल आधारित मदतस्थळ | नागरीकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी |

| | |
|---|---|
| | पासपोर्ट संकेतस्थळाच्या माध्यमातुन कार्यरत |
| एम पासपोर्ट सेवा | पासपोर्ट संदर्भातील माहीती व आवेदनाची स्थिती देण्यासाठी स्मार्ट फोन वापरकर्ते साठी मोबाईल ॲपचे डिझाईन केले आहे. |
| पासपोर्ट मेळावा | नागरीकांना आवेदन जमा करण्यासाठी अधिक वेळ उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष उपाय म्हणुन पासपोर्ट ऑफीस/पीएसके मध्ये सार्वजनिक/नियमित सुट्टयांच्या दिवशी पासपोर्ट मेळावा आयोजित केला जातो. |
| पासपोर्ट अदालत | साधरणपणे दिर्घ प्रलंबित गा-हाणी व जटील प्रकरणे सोडविण्यासाठी पासपोर्ट ऑफिसमध्ये पासपोर्ट अदालत आयोजित केली जाते |
| पासपोर्ट सेवा शिबिर | आवेदकांच्या फायद्यासाठी, गरजेनुसार पीएसके पासुन लांबच्या ठिकाणी पासपोर्ट सेवा शिबिरांचे आयोजन केले जाते. |

## ६) सेवा वितरण मानदंड आणि वेळेच्या मुदती :-

वैधानिक तरतुदी नुसार अर्ज मिळाल्यानंतर, पासपोर्ट जारी करणारे अधिकारी, त्यांना वाटणाऱ्या उचित व जरुरी चौकश्या केल्या नंतर, पासपोर्ट किंवा प्रवासी दस्तऐवज जारी करतील किंवा जारी करण्यास नकार देतील. खाली दिलेल्या वेळेच्या मर्यादा या पोलीस चौकशी किंवा इतर कुठलीही चौकशी किंवा इतर घटक जो पासपोर्ट जारी करण्याच्या अधिकाराच्या नियंत्रणापलीकडे असु शकतो. याच्या आधिन आहे.

| सेवेचा प्रकार | सूचक वेळ मर्यादा | शेरा |
|---|---|---|
| **फ्रेश पासपोर्ट (प्रथम वेळ) पोलीस पडताळणी जारी करण्यापुर्वी आवश्यक(पी व्ही)** | ३० कार्यालयीन कामाच्या दिवसांपर्यत (पी व्ही चा कालावधी वगळुन) | संपुर्ण दस्तऐवज व नोंदणी प्राप्त झालेल्या दिनांकापासुन व पासपोर्ट जारी करणाऱ्या अधिकाऱ्याचे समाधान क्लिअर पोलीस पडताळणी अहवाल प्राप्ती यांना अधिन राहुन. |
| **फ्रेश पासपोर्ट (प्रथम वेळ) पासपोर्ट जारी केल्यानंतर पी व्ही जरुरी किंवा जिथे पी व्ही ची गरज नाही.**<br>**i. तात्काळ**<br>**ii. निमशासकीय** | ७ कार्यालयीन कामाच्या दिवसांपर्यंत | संपूर्ण दस्तऐवज व नोंदणी प्राप्त झालेल्या दिनांकापासून व ओळख प्रमाणपत्र / व्हेरीफिकेशन प्रमाणपत्र / नाहरकत प्रमाणपत्र यांची सत्यता पृष्टीं व पासपोर्ट |

| | | |
|---|---|---|
| **कर्मचारी इ.** | | जारी करणाया अधिका-यांचे समाधान यांना अधिन राहून |
| **व्हिसा पाने समाप्ती व वैधता पुर्ण झाल्यानंतर पासपोर्ट Re-issue करणे** | ७ कार्यालयीन कामाच्या दिवसांपर्यंत (अशा केसेस जेथे पूर्व पोलीस पडताळणी जरुरी नाही ) | संपूर्ण दस्तऐवज व नोंदणी प्राप्त झालेल्या दिनांकापासून व पासपोर्ट जारी करणाया अधिका-यांचे समाधान यांना अधिन राहून वैयक्तीक तपशीलामध्ये कोणताही बदल झालेला नसावा. |
| **पासपोर्ट Re-issue**<br>**अ) वैयक्तीक तपशील बदलासाठी, आणि/ किंवा**<br>**ब) हरवलेला / चोरीस गेलेला / खराब झालेला / तुटलेला बदलण्यासाठी** | ७ कार्यालयीन कामाच्या दिवसांपर्यंत जिथे पुर्व पोलीस पडताळणी आवश्यक नाही आणि ३० कार्यालयीन कामाच्या दिवसांपर्यंत जेथे पी व्ही आवश्यक आहे (पी व्ही) कालावधी वगळून | संपूर्ण दस्तऐवज व नोंदणी प्राप्त झालेल्या दिनांकापासून व पासपोर्ट जारी करणाया अधिका-यांचे समाधान व इतर जरुरी पडताळणी / मंजूरी यांना अधिन राहून |
| **इतर सेवा जशा पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट, सरेंन्डर सर्टिफिकेट किंवा पासपोर्ट वर आधारित इतर प्रमाणपत्र** | ३ कार्यालयीन कामाच्या दिवसांपर्यंत (अशा केसेस जिथे पोलीस पडताळणी जरुरी नाही) | संपूर्ण दस्तऐवज व नोंदणी प्राप्त झालेल्या दिनांकापासून व पासपोर्ट जारी करणाया अधिका-यांचे समाधान व इतर जरुरी पडताळणी / मंजूरी यांना अधिन राहून |

**७ अर्जदाराच्या सामान्य जबाबदा-या :-**

1. कायदयाने सर्व पासपोर्ट अर्जदारांना आपला अर्ज खरी माहिती वैदय व सत्य कागदपत्रे यांच्या सोबत सुपूर्त केला पाहिजे. पासपोर्ट ॲक्ट १९६७ च्या प्रावधानानूसार कुठल्याही अर्जदाराने खोटी माहिती दिली नाही पाहिजे व कुठलीही माहिती दडविली नाही पाहिजे. अशी कोणतीही कृती केल्यास किमान २ वर्षापर्यंत शिक्षा व रु. ५०००/- पर्यंत दंड किंवा दोन्हीही शिक्षांनी दंडीत केले जाईल.
2. विहीत नमुन्यातील अर्ज www.passportindia.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईल सुपूर्त करुन पासपोर्ट सेवा केंद्र येथे वैयक्तीकरित्या नोंदणीसाठी जावे. नोदणी करतेवेळी बायोमेट्रीक्स फोटो घेतले जातील व जरुरी असल्यास फी गोळा करण्यात येईल. आवेदकांनी वेळेच्या मर्यादेत जरुरी सेवा पासपोर्ट जारी करणा-या अधिका-यांकडून मिळविण्यासाठी सर्व जरुरी औपचारीकता वेळ मर्यादेत जर दिलेली असेल तर पुर्ण करणे आवश्यक आहे.
3. अर्जदारांना असा सल्ला देण्यात येतो की कोणतीही शंका / गा-हाणे उपस्थित करण्यापूर्वी अर्जदारांनी आपल्या अर्जाचा सदय स्थिती (Status) तपासून पहावी.

### ८. तक्रार निवारण

4. सेवा माफ दंडाचे पालन न होण्यासंदर्भात किंवा सेवा देण्यात अयशस्वी होणेबाबत किंवा पासपोर्ट जारी करणा-या अधिका-याच्या कामाकाजाबाबत कोणतीही तक्रार किंवा गा-हाणे असेल तर खालील ठिकाणी ऑनलाईन नोंद करावी.

अ) केंद्रीय सार्वजनिक गा-हाणी निवारण व देखरेख प्रणाली (CPGRAMS) pgportal.gov.in किंवा
ब) www.passportindia.gov.in किंवा
क) टोल फ्री नंबर १८००- २५८-१८०० याच्यावर नोंद करावी.

### ९. अभिप्राय आणि सूचना

a. अभिप्राय व सूचना खालीलप्रमाणे देऊ शकता.

१. पासपोर्ट संकेतस्थळ www.passportindia.gov.in (click feedback) यावर लॉग इन करावे.
२. टोल फ्री नंबर १८००- २५८-१८०० याच्यावर नोंद करावी.
३. किंवा खालील अधिका-यांना लेखी निवेदनाद्वारे असिस्टंट पासपोर्ट ऑफीसर (PG) जनतक्रार निवारण कक्ष (Public Grievance cell ) रुम नं. २४ सी. पी. व्ही. डिव्हीजन विदेश मंत्रालय पटीयाला हाऊस, अॅनेक्स, टिळक मार्ग नवी दिल्ली- ११०००१

फोन नंबर – ०११२३३८४५१९ , २३३८४४९७

फॅक्स नंबर – ०११-२३३८४४६१

ई-मेल – www.passport.pg@mea.gov.in

### १०. सनदीचे पुढील पुनरावलोकन महिना / वर्ष :-

ही सनद फेब्रूवारी २०१६ मध्ये जारी करण्यात आलेली आहे. सनदीचे पुनरावलोकन जुलै २०१६ ला करण्याचा मानस आहे.